# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय

प्रकाशगड, 2रा मजला, प्लॉट क्र. जी-९, प्रो. ए.के. मार्ग. वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
दूरध्वनी क्र. : ०२२ - ६९८५३५१२ I ई-मेल : apro@mahagenco.in, pro@mahagenco.in

क्र. : महानिर्मिती/जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/२२१ दिनांक : २१/०७/२०२५.

**- वृत्तपत्रीय निवेदन -**

**महानिर्मितीच्या संचालक (वित्त) पदी मनेष वाघीरकर रुजू**

**(मुंबई, दि. २१ जुलै २०२५)** - श्री. मनेष विश्वनाथ वाघीरकर यांनी नुकताच ऊर्जा क्षेत्रातील अग्रगण्य अशा महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीचे संचालक (वित्त) म्हणून पदभार स्वीकारला आहे. त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकी मध्ये पदवी प्राप्त केली असून त्यांना सुमारे २६ वर्षांचा प्रशासकीय सेवेचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी यापूर्वी कोषागार अधिकारी, जालना, सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा, ठाणे, सहसंचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ तसेच मुख्य वित्त अधिकारी, ठाणे महानगर पालिका आणि वित्त नियंत्रक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई म्हणून आपल्या प्रशासकीय कार्याचा ठसा उमटवित प्रशासकीय सेवेतील उत्तम अधिकारी म्हणून नावलौकिक कमावला आहे. कोविड १९ काळामध्ये नोडल ऑफिसर असताना अन्न पुरवठा तसेच तात्पुरते कोविड हॉस्पिटल उभारणी ही जबाबदारी त्यांनी पार पाडली असून ठाणे महानगर पालिकेमध्ये त्यांचे पुढाकारातून हॅप्पीनेस इण्डेक्स बजेट तसेच एक रुपयात आरोग्य सेवा इत्यादि नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आले. आपल्या महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ येथील कर कार्यकाळामध्ये अनेक ‘स्टार्ट अप’ (लघु उद्योग) यांना व्यवसाय वृद्धीकरिता राष्ट्रीय पातळीवर प्रगती मैदान, दिल्ली येथे प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिला आहे.

महानिर्मितीतर्फे किफायतशीर दरामध्ये अखंडित वीज उत्पादन ठेवणे तसेच औष्णिक कडून हरित ऊर्जेकडे वाटचालीला गती देणे आणि नियोजित वेळेमध्ये प्रकल्प उभारणी करताना प्रस्तावित वीज प्रकल्पांना गती देणे हे आपले प्राधान्यक्रम असल्याचे त्यांनी सांगितले.

---

**- PRESS RELEASE -**

**MANESH WAGHIRKAR ASSUMES CHARGE AS DIRECTOR (FINANCE) OF MAHAGENCO**

**(Mumbai, July 21, 2025) -** Mr. Manesh Vishwanath Waghirkar has recently assumed the charge as the Director (Finance) of Maharashtra State Power Generation Company Ltd. (MAHAGENCO), a leading entity in the energy sector.

He holds a degree in Civil Engineering and has over 26 years of extensive experience in administrative service.

In his distinguished career, he has served in various important roles such as Treasury Officer, Jalana, Assistant Director of Local Fund - Thane, Joint Director at Maharashtra Small Scale Industries Development Corporation (MSSIDC), Chief Finance Officer – Thane Municipal Corporation, and Finance Controller – Slum Rehabilitation Authority, Greater Mumbai. Through these roles, he has established a reputation as an efficient and visionary officer.

During the COVID-19 pandemic, he served as a Nodal Officer, successfully overseeing food supply and the establishment of temporary COVID hospitals. At Thane Municipal Corporation, under his initiative, innovative programs like the Happiness Index Budget and One Rupee Health Services were launched.

While serving at the Maharashtra Small Scale Industries Development Corporation, he played a key role in supporting numerous start-ups and small-scale enterprises, helping them grow by providing them with access to national-level platforms at Pragati Maidan, Delhi.

Mr. Waghirkar stated that at MAHAGENCO, his priorities will include :
- Maintaining uninterrupted power generation at affordable rates,
- Accelerating the transition from thermal to green energy,
- Fast-tracking proposed power projects by ensuring timely project execution.



**MR. MANESH VISHWANATH WAGHIRKAR**
**DIRECTOR (FINANCE)**
**MAHAGENCO**